तीन जिल्ह्यांत इंधनाचे 'रेशनिंग'!

● दुचाकीसाठी २००, तीन-चारचाकीसाठी दोन हजार रुपयांचे इंधन
● जालना, छत्रपती संभाजीनगरच्या जिल्हाधिकाऱ्यांचा आदेश

लोकसत्ता विशेष प्रतिनिधी

छत्रपती संभाजीनगर : जालना व छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात दुचाकी वाहनांसाठी दोनशे रुपये, तर तीनचाकी आणि चारचाकी वाहनांसाठी जास्तीत जास्त दोन हजार रुपयांचे इंधन देण्यात यावे, असा आदेश जालना जिल्हा पुरवठा अधिकाऱ्यांनी काढले आहेत. त्यामुळे पेट्रोल पंपावर मोठ्या रांगा दिसून आल्या. काही पेट्रोल पंपांवर इंधन संपल्याचे फलक लागल्याने टंचाईप भर पडली आहे. वापुढे कोणत्या प्रकारच्या कॅन, बाटल्या, तसेच ड्रममध्ये इंधन देण्यात येऊ नये, असे कळविण्यात आले आहे.

दरम्यान, याच प्रकाराचा आदेश छत्रपती संभाजीनगर शहरासाठीही लागू करण्याच्या हालचाली सुरू झाल्या आहेत. पेट्रोल आणि डिझेलचा

साठा पुरेसा असला, तरीही टंचाई जाणवेल या भीतीमुळे पेट्रोलपंपावर लांबच लांब रांगा लागल्या आहेत. त्यावर नियंत्रण मिळविण्यासाठी प्रत्येक दुचाकीसाठी फक्त दोनशे रुपयांपर्यंतचे पेट्रोल देण्याबाबतचा निर्णय घेण्याच्या हालचाली सुरू करण्यात आल्या आहेत. जिल्हा पुरवठा अधिकारी प्रवीण फुलारी यांनी या संदर्भातील आदेश बजावला आहे.

दरराेज लागणाऱ्या इंधनाचा पुरवठा सुरळीत सुरू आहे. मात्र, लोक अचानक रांग लावून अधिक पेट्रोल भरून घेत आहेत. दुसरीकडे पेट्रोल पंपचालकांना इंधन खरेदीसाठी अग्रीम रक्कम देण्याचा आदेश देण्यात आला आहे. दुपारी तीनपर्यंत रक्कम खात्यातून भरली, तरच इंधनपुरवठा होईल, असे सांगण्यात आले. पेट्रोल व डिझेल असोसिएशनचे अध्यक्ष अखिल अब्बास म्हणाले, 'परिस्थिती एवढी वाईट नाही. पण नाहक गर्दी केल्याने अडचणीत वाढ होत आहे. काही जणांनी अग्रीम रक्कम न भरल्याने त्यांच्याकडचा साठा संपला. त्यामुळे लोक अधिक घाबरले आहेत. ही स्थिती लवकरच बदलेल.'

दरम्यान, इंधन साठा पुरवठ्याचे नियम जिल्हा पातळीवर बदलण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे. कोल्हापूर, सोलापूरप्रमाणे छत्रपती संभाजीनगरमध्येही नवे नियम लागू होण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे. जालना जिल्हा पुरवठा अधिकाऱ्यांनी आदेशाची अंमलबजावणी तातडीने करावी, असे नमूद केले आहे. मात्र, जीवनावश्यक सेवा, रुग्णवाहिका यांना पुरेशा प्रमाणात इंधन द्यावे, अशा सूचनाही देण्यात आल्या आहेत.

पुरवठा अधिकारी प्रवीणसिंह फुलारी म्हणाले, छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यास दररोज १९ लाख लिटर इंधन लागते. ते मिळतही आहे. पण पेट्रोल सॅपिल अशी अफवा उठल्याने रांगा लागल्या आहेत. तसे भीती बाळगण्याचे कारण नाही. शहरात ४७ पेट्रोलपंप आहेत तर जिल्ह्यात ३३७ पेट्रोलपंप आहेत.'

> "छत्रपती संभाजीनगर, जालना आणि नांदेड जिल्ह्यात प्रत्येक दुचाकी आणि चारचाकीसाठी पेट्रोल किती द्यावे याचे निकष संबंधित जिल्हाधिकाऱ्यांनी ठरवले आहेत. पेट्रोलची टंचाई नाही. मात्र, घाबरून जाऊन अधिक पेट्रोल खरेदी करण्याचे प्रमाण वाढल्याने पेट्रोल पंप कोरडे पडू लागले आहेत. एक पेट्रोलपंप कोरडा पडला तर तो पुन्हा पूर्ववत करण्याचा कालावधी अधिक आहे. त्यामुळे काही जिल्ह्यात रेशनिंग करावे लागत आहे."
> **-जितेंद्र पापळकर**, विभागीय आयुक्त

नाहक रांगा लावल्याचा आरोप

पुरेसे इंधन असतानाही नाहक रांगा लावल्या जात आहेत. गरज नसताना अधिकचे पेट्रोल भरून घेतले जात असल्याचे टंचाईसदृश स्थिती निर्माण होत आहे. दरराेज पुरेसा साठा येत आहे. मात्र, परिस्थिती नियंत्रणाबाहेर जाऊ नये म्हणून ही काळजी घेण्यात आल्याचे अधिकारी सांगत आहेत

छत्रपती संभाजीनगरमध्ये श्रीराम नवमीचा उत्साह

छत्रपती संभाजीनगरमधील किराडपुरा श्रीराम मंदिरात श्रीराम जन्मोत्सव करण्यात आला.

लोकसत्ता प्रतिनिधी

छत्रपती संभाजीनगर : श्रीराम नवमीचा उत्साह घरोघर दिसून आला. श्रीराम लिहिल्याचा छापा कुंकू व भगव्या रंगाने कपाळी उमटवलेले अनेक भाविक गुरुवारी शहराच्या विविध भागातून फिरताना दिसून आले. शहरातील प्रमुख श्रीरामांच्या मंदिरांमध्ये दुपारी बाराच्या सुमारास जन्मोत्सवासाठी भाविकांनी मोठी गर्दी केली होती. वानंतर 'जय-श्रीराम'च्या गजराने परिसर दुमदुमून गेला होता.

किराडपुरा भागातील श्रीराम मंदिरात दर्शनासाठी सकाळपासून भाविक दाखल होत होते. जन्मोत्सवाच्या सुमारास सर्वपक्षीय नेत्यांची उपस्थिती होती. त्यामध्ये राज्यातील मंत्री अतुल सावे, माजी खासदार चंद्रकांत खैरे, माजी विरोधी पक्षनेते अंबादास दानवे, आमदार संजय केणेकर, ज्येष्ठ उद्योजक मानसिंग पवार, नगरसेविका अंड. माधुरी अदवंत, पृथ्वीराज दाैर, बसैय्ये बंधू आदींचा समावेश होता. या नेत्यांच्या हस्ते श्रीरामांच्या जन्मोत्सवानंतर आरती करण्यात आली. भाविकांना प्रसाद वाटप करण्यात आले. भाविकांमध्ये महिला-बच्चे कंपनीची संख्या लक्षणीय होती. काही महिलांनी त्यांच्या बच्चे कंपनीला श्रीराम-लक्ष्मणांची वेशभूषा करून नटवून आणले होते.

मंदिरांमध्ये येणाऱ्या भाविकांसाठी पाणी, शरबताची व्यवस्था करण्यात आली होती. तीन वर्षांपूर्वी किराडपुरा श्रीराम मंदिराच्या परिसरात दंगल उसळली होती. या कटू आठवणींचे विस्मरण जन्मोत्सावाच्या अभूतपूर्व उत्साही वातावरणात झाले होते. शहरातील समर्थनगर, सिडको परिसरातील श्रीराम, हनुमानांच्या मंदिरांमध्ये जन्मोत्सवानिमित्त विद्युत रोषणाई करण्यात आली. भगव्या कागदी पताकांनी परिसरात सजावट केली होती. शहराच्या विविध भागांमध्ये दुभाजकांवर श्रीरामांची प्रतिमा असलेल्या भगव्या पताका लावण्यात आल्या होत्या. अनेक ठिकाणी गीत-रामायण, श्रीरामांच्या भजनांच्या कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

ग्रामीण भागातील मंदिरांमध्ये श्रीराम, हनुमानांच्या मूर्तीची प्रतिष्ठापना पुरातन काळापासून करण्यात आलेली असून, त्या मंदिरांमध्येही श्रीराम नवमीनिमित्त कीर्तन, प्रवचन, निरुपणासह विविध धार्मिक, सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

पत्नीचा खून करणाऱ्यास धाराशिवमध्ये जन्मठेप

छत्रपती संभाजीनगर : चारित्र्याच्या संशयावरून पत्नीची हत्या करणाऱ्या धाराशिव जिल्ह्यातील नळदुर्ग येथील आरोपी पतीस जिल्हा व सत्र न्यायालयाने जन्मठेप आणि ३० हजार रुपये दंडाची शिक्षा सुनावली आहे. वाहीद बिलाल कुरेशी (वय ३८) असे शिक्षा झालेल्या आरोपीचे नाव आहे. या खटल्यात प्रत्यक्षदर्शी लहान मुलाची साक्ष अत्यंत महत्त्वाची ठरली.

नोव्हेंबर २०२४ मध्ये नळदुर्ग येथे ही थरारक घटना घडली होती. मृतमुखी पडलेली सुलताना ही नळदुर्ग येथील सरकारी दवाखान्यासमोर चहाची टपरी चालवून कुटुंबाचा उदरनिर्वाह करत होती. मात्र, पती वाहीद कुरेशी हा तिच्या चारित्र्यावर संशय घेऊन सतत भांडण व मारहाण करत असे. दि. ५ नोव्हेंबर २०२४ रोजी पहाच्या टपरीवर दोघांमध्ये वाद झाला. वाहीदने रागाच्या भरात सुलतानावर चाकू आणि काठीने पोटात, पाठीवर आणि गळ्यावर गंभीर वार केले. या हल्ल्यात सुलतानाचा जागीच मृत्यू झाला. धक्कादायक म्हणजे, पत्नीची हत्या केल्यानंतर आरोपीने स्वतःच्या पोटावर आणि गळ्यावरही वार करून आत्महत्येचा प्रयत्न केला होता. दोन्ही बाजूंचा युक्तिवाद आणि सादर करण्यात आलेले पुरावे ग्राह्य धरून, प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश अभिश्री देव यांनी आरोपी वाहीद कुरेशी याला दोषी ठरवले. त्याला जन्मठेप आणि ३० हजार रुपये दंड, तसेच दंड न भरल्यास अतिरिक्त शिक्षेचा आदेश दिला आहे.

लहान मुलाची साक्ष निर्णायक

या प्रकरणाचा तपास पोलीस उपनिरीक्षक आय. आर. नांगरे व सहायक पोलीस निरीक्षक एन. पी. सोळुंके यांनी केला. खटल्यादरम्यान सरकारी पक्षातर्फे जिल्हा शासकीय अभियोक्ता महेंद्र देशमुख यांनी एकूण १२ साक्षीदार तपासले. घटनेच्या वेळी उपस्थित असलेल्या लहान मुलाने दिलेली प्रत्यक्षदर्शी साक्ष आरोपीला गुन्हेगार सिद्ध करण्यासाठी महत्त्वाची ठरली.

बेकरी उत्पादनाच्या दरात वाढ; वडापावही महागण्याची चिन्हे

लोकसत्ता प्रतिनिधी

छत्रपती संभाजीनगर : चटपटीत खाद्य म्हणा की एकवेळच्या जेवणाचा पोटाला आधार, सर्वसामान्यांच्या जिभेच्या जवळ असलेला वडापाव या महागाई मार्गावर निघतो की काय, अशी चिन्हे निर्माण झाली आहेत. छत्रपती संभाजीनगरमधील बेकरी उत्पादनांच्या दरामध्ये दोन ते पाच रुपयांनी वाढ झाली आहे. व्यावसायिक सिलिंडरची टंचाई, त्यांचे वाढलेले दर, तेल, वनस्पती तूप, मैदा, या सर्वच घटक वस्तूंमध्ये वाढ झाल्याने बेकरी उत्पादनांचे दर वाढवण्याशिवाय पर्याय उरला नसल्याचे उत्पादक व्यावसायिक सांगत आहेत.

वडापावसाठी लागणाऱ्या पावांचे दर सहा नगांच्या लादीमागे दोन रुपये तर एक डझनच्या लादीमागे चार रुपयांची वाढ झाली आहे. उत्पादन करणाऱ्या बेकरींच्या दुकानांमध्ये 'आवश्यक सर्वच वस्तूंचे भाव वाढल्याने उत्पादनांची भाववाढ झाली आहे' असे सूचना फलक लावण्यात येत आहेत.

येथील बेकरी व्यवसायात असलेल्या कुलकर्णी बंधूंकडील व्यवस्थापकाने सांगितले की, समूहाचे पिसादेवी येथील उत्पादन केंद्र बंद ठेवण्यात आले आहे. बजरंग चौकातील केंद्रातूनच उत्पादन सध्या केले जात आहे. सिलिंडरची टंचाई जाणवत असून, मैदा ५० किलोच्या कट्ट्यामागे २०० रुपयांनी वाढला आहे.

वनस्पती तुपाचा १५ किलोचा डबा आता सोळाशेंवरून थेट बत्तीसशे रुपयांना झाला आहे. म्हणजे दुप्पटच वाढ झाली आहे. तेलाचेही दर मागील काही दिवसांमध्ये वाढलेले असून, १७० रुपये प्रतिकिलोने खरेदी करावे लागत आहे. या शिवाय इतरही मालाचे दर वाढल्याने वडापाव, पावभाजीसाठी लागणाऱ्या पावलादीच्या किमतीत वाढ झाली आहे. सहा पावांच्या लादीमागे दोन रुपये तर डझनच्या संख्येतील लादीमागे चार रुपयांची वाढ झाली आहे.

बनपाव, खारी अशा सर्वच बेकरी पदार्थांमध्ये दोन ते पाच रुपयांची वाढ करण्याशिवाय पर्याय उरला नाही. पिसादेवी येथील ओव्हन यंत्र सिलिंडरअभावी बंद ठेवण्यात आले आहे. सरू करायचे तर डिझेल लागेल. डिझेल मिळाले नाही तर किमान सरपणाची व्यवस्था करावी लागणार आहे.

व्यावसायिक सिलिंडरमुळे अडचण

शहरात सध्या तरी वडापावचे दर वाढलेले नाहीत. शहरात विविध ठिकाणचे वडापावचे दर सध्या ९० ते ९५ रुपयांपर्यंत आहेत. परंतु पावाचे दर वाढले आहेत. पावाचे दर वाढल्याने वडापाव महागण्याची चिन्हे दिसू लागली आहेत. यासंदर्भात विवेकानंद महाविद्यालयाजवळील वडापाव व्यावसायिक गायकवाड यांनी सांगितले की, सध्या आम्ह्याकडे येणाऱ्या पावामध्ये दरवाढ झाली नाही. परंतु आम्हाला महाग, जादा रक्कम देऊन व्यावसायिक सिलिंडर घ्यावे लागत आहे. पावाचे दर वाढले तर वडापावच्याही किमती वाढवण्याशिवाय पर्याय नाही. एक फ्रेंच्राईजी कंपनीद्वारे चालवण्यात येणाऱ्या वडापाव दुकानातील महिला व्यावसायिकेने सांगितले की, डिसेंबरमध्ये दहा रुपयांच्या वडापावची किंमत १२ रुपये केली आहे. आता पुन्हा किंमत वाढवली नाही. परंतु पावाच्या किमती वाढलेल्या आहेत.

चिकलठाणा, जाफरगेट, पीर बाजार बंद करणार

मनपा आयुक्तांची भूमिका

छत्रपती संभाजीनगर : महानगरपालिका स्थापन होण्यापूर्वी सुरू असलेले चिकलठाणा, जाफरगेट आणि शहानुरमिया दर्ग्यातील पीर (सोमवारचा) आठवडी बाजार बंद करण्याची घोषणा मनपा आयुक्त जी. श्रीकांत यांनी आज बुधवारी अर्थसंकल्प सादर करताना केली. आठवडी बाजारामुळे वाहतूक कोंडी, अपघात आणि वादविवाद होऊन मोठ्या प्रमाणात अस्वच्छता निर्माण होते, असेही त्यांनी स्पष्ट केले. त्यामुळे आता शहरात आठवडी बाजार ही संकल्पना मोडीत निघणार आहे.

महापालिका प्रशासनाने सन २०२६-२७ या आर्थिक वर्षासाठी अंदाजपत्रक तयार करून आयुक्त जी. श्रीकांत यांच्या हस्ते स्थायी समितीचे सभापती अनिल मकरिये यांच्याकडे सादर केले. अंदाजपत्रक सादर करताना आयुक्तांना विविध विभागांवर जमा-खर्चाचा तपशील देखील मांडला. यावर्षी प्रामुख्याने शहरात महापालिका स्थापन होण्यापूर्वी सुरू असलेले आठवडी बाजार बंद करण्याची घोषणा त्यांनी केली. शहरात चिकलठाणा, जाफरगेट आणि शहानुरमिया दर्गा भागात पीर बाजार म्हणून आठवडी बाजार भरवला जातो. या आठवडी बाजारात फिरत्या विक्रेत्यांसह परिसरातील शेतकरी देखील भाजीपाला, धान्य घेऊन विक्रीसाठी येतात. दर आठवड्यात प्रत्येक बाजारात साधारणपणे २५ ते ५० लाख रुपयांची उलाढाल होते. आठवडी बाजारात खरेदीसाठी शहरातील नागरिक मोठी गर्दी करतात. ताजा भाजीपाला स्वस्तात मिळत असल्याने आठवडाभराचा भाजीपाला, फळे, कडधान्य, धान्य घेऊन जातात. या आठवडी बाजारामुळे वाहतूक कोंडी होत असून, अपघात होत असल्याने वादविवाद होतात. तसेच बाजारात ठिकाणी मोठ्या प्रमाणात अस्वच्छता निर्माण होते. त्यामुळे महानगरपालिका क्षेत्रामध्ये आठवडी बाजार भरविण्यास पूर्णपणे बंदी करण्यात येणार आहे.

भाजीमंडईच्या गाळ्यांमध्ये भाजी बाजार भरणार त्याऐवजी मनपाच्या विविध ठिकाणी उभारण्यात आलेल्या भाजी-मंडईमध्ये अस्तित्वात असलेल्या गाळ्यांमध्ये भाजी बाजार भरविण्यास मान्यता देण्यात येणार आहे. त्यासाठी अस्तित्वात असलेल्या भाजी मंडईची डागडुजी करून गरजेनुसार नवी गाळ्यांची निर्मिती करण्यात येणार आहे. त्यामुळे यानंतर रस्त्यावर आठवडी बाजार भरवणे, रस्ता दुभाजकांमध्ये व्यवसाय करण्यास संपूर्णपणे प्रतिबंध घालण्यात येणार असल्याचे आयुक्त जी. श्रीकांत यांनी स्पष्ट केले.

'गोविंद सन्मान' पुरस्काराचे उद्या वितरण

लोकसत्ता प्रतिनिधी

छत्रपती संभाजीनगर : येथील गोविंद देशपांडे स्मृती कार्यक्रमाचे शनिवारी येथे आयोजन करण्यात आले आहे. मागील १८ वर्षांपासून गोविंद सन्मान पुरस्काराने मराठवाड्यातील एका मान्यवरास सन्मानित करण्यात येते. यंदाचा गोविंद सन्मान पुरस्कार ज्येष्ठ पशुवैज्ञानिक डॉ. दिवाकर कुलकर्णी मांडाखळीकर यांना डॉ. चंद्रशेखर बिडवई यांच्या हस्ते प्रदान करण्यात येणार आहे.

उद्या (शनिवारी) सायंकाळी साडेसहा मराठवाडा महसूल प्रबोधिनी येथे हा कार्यक्रम होणार आहे. यावेळी रविशंकर झिंगरे यांचे 'डोकं 'चालतं' कसं ?- मेंदूचे कार्य व ए आय विषयक हकश्राव्य विज्ञान' या विषयावर व्याख्यान होणार आहे, असे गरुड परिवाराच्या वतीने कळवण्यात आले आहे.

गरवारे स्टेडियम परिसरातील वृक्ष तोडण्याचा प्रस्ताव; खंडपीठात याचिका

छत्रपती संभाजीनगर : येथील गरवारे स्टेडियमच्या परिसरातील ७५ वृक्षे तोडण्याचा एक प्रस्ताव तयार करण्यात आला असून, त्याविरोधात मुंबई उच्च न्यायालयाचा औरंगाबाद खंडपीठात जनहित याचिका दाखल करण्यात आली आहे. याप्रकरणी केंद्र व राज्य शासन, वन-पर्यावरण विभाग आणि महानगरपालिका आयुक्तांना नोटीस बजावून दोन आठवड्यात प्रतिवादींनी उत्तर दाखल करावे, असे आदेश खंडपीठाने दिले आहेत.

शहरातील गरवारे स्टेडियम येथे दक्षिण पॅव्हेलियनच्या बांधकामासाठी अंदाजे ७५ विविध प्रजातींच्या वृक्षांची कत्तल करण्याच्या प्रस्तावाविरोधात ११ कोटी वृक्ष लागवड व संवर्धन समितीकडून ही जनहित याचिका दाखल करण्यात आली आहे.

महापालिकेने कोणतीही सार्वजनिक सुनावणी न घेता आणि पर्यायी वृक्षारोपणाचा विचार न करता ही वृक्षतोड केली जात असल्याचा आक्षेप या याचिकेत घेण्यात आला आहे. महापालिकेने १० फेब्रुवारी २०२६ रोजी वर्तमानपत्रात प्रसिद्ध केलेल्या जाहिरातीनुसार गरवारे स्टेडियममधील जुने आणि डेरेदार वृक्ष तोडण्याची प्रक्रिया सुरू केली आहे. या निर्णयाविरुद्ध ७ फेब्रुवारी २०२६ रोजी निवेदन देऊनही प्रशासनाने त्याची दखल न घेतल्याने अखेर न्यायालयाचे दार ठोठावले असल्याचे समितीने म्हटले आहे.

पर्यावरण प्रभाव मूल्यांकन न करता आणि 'महाराष्ट्र नागरी क्षेत्र झाडांचे जतन व संरक्षण अधिनियम १९७५' मधील तरतुदींचे उल्लंघन करून ही कारवाई केली जात असल्याचा आरोप याचिकाकर्त्यांनी केला आहे.

डॉ. समीर कदम यांचे निधन

छत्रपती संभाजीनगर : नवी मुंबई येथील एमजीएम महाविद्यालय व

रुग्णालयातील शल्य विभाग प्रमुख, अधिष्ठाख्याते, हृदयरोग तज्ज्ञ डॉ. समीर कदम यांचे मुंबईत अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर मंगळवारी लिबगाव (ता. जि. नांदेड) येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात पत्नी, मुलगा, आई-वडील, चुलते-चुलत्या, बंधू-भगिनी, वहिनी असा परिवार आहे.

नवी मुंबईतील एमजीएमचे संचालक, अधिष्ठाता डॉ. सुधीरचंद्र कदम यांचे पुत्र तर एमजीएमचे अध्यक्ष, माजी शिक्षणमंत्री कमलकिशोर कदम, छत्रपती संभाजीनगर येथील एमजीएम विद्यापीठाचे कुलपती अंकुशराव कदम यांचे पुतणे होत.

ॲक्सिस बँक लि.

गहाण ठेवण्यात आलेल्या सोन्याच्या दागिन्यांचा लिलाव करण्यासाठी जाहीर सूचना

विशेष करून कर्जदार आणि सर्वसाधारण जनतेस याद्वारे कळविण्यात येते की, खाली नमूद करण्यात आलेल्या खात्यांमधील महाप्रातरम ठेवण्यात आलेल्या सोन्याच्या दागिन्यांचा लिलाव खाली नमूद करण्यात आलेल्या बँकेच्या शाखांमध्ये करण्याचे नियोजित करण्यात आले आहे.
खाली नमूद करण्यात आलेल्या कर्जदारांनी ॲक्सिस बँक लि. याच्याकडे सोन्याचे दागिने महाप ठेवून कर्ज सुविधा ("सोने तारण कर्ज सुविधा") प्राप्त केली आहे. सदर सोने तारण कर्जाची येणे बाकी रक्कमेची परतफेड करण्यासाठी सदर कर्जदार/जामीनदार यांना मागणी नोटिसा बजावण्यात आल्या आहेत. जसे की, कर्जदार/जामीनदार यांनी येणे बाकी रक्कमेची परतफेड केलेली नाही, त्यामुळे बँकेच्या सदर तारणाच्या बाबत करून महाप ठेवण्यात आलेल्या सोन्याच्या दागिन्यांचा विशेषतः पुढील परिशिष्टात नमूद करण्यात आलेल्या दागिन्यांचा **दि. २७/०४/२०२६ रोजी दुपारी १२.३० ते ३.३० दरम्यान "जे आहे जेथे आहे", "जे आहे, जसे आहे," "तेथे जे काही आहे," आणि "कोणताही फेरविचार नाही"** या तत्त्वावर ई-लिलाव करणे भाग आहे. कर्जदार आणि त्यांच्याकडून येणे असलेल्या रक्कमेचा तपशील पुढीलप्रमाणे :

ग्राहकाचे नांव	कर्ज खाते क्र.	येणे रक्कम (रु.)	रिकॉल नोटीसीची तारीख	एकूण वजन	निव्वळ वजन
शाखेचे नाव : अजंटा रोड, जेएल जेजीएल (महाराष्ट्र)					
निशा राज जावळे	XXXXXXXXXXX३२२७	१५७८५५७.००	२३/०२/२०२६	२७४.८९०	२७३.३४०
महेश कुलकर्णी	XXXXXXXXXXX८८१९	११९९३५.००	१६/०२/२०२६	३४.४००	३४.२५०
महेश कुलकर्णी	XXXXXXXXXXX१००९	१३५०४१.००	१६/०२/२०२६	२२.२६०	२२.२६०
शाखेचे नाव : अमळनेर जेजीएल (महाराष्ट्र)					
दिपक माधवराव पाटील	XXXXXXXXXXX७३१५	५४४१४३.००	१९/१२/२०२५	७०.३००	६९.८५०
राकेश सुकदेव पाटील	XXXXXXXXXXX०८१७	७९१०८.००	०९/०२/२०२६	१०.५००	१०.४५०
शाखेचे नाव : देवपूर (महाराष्ट्र)					
दिनेश लक्ष्मण बावीस्वार	XXXXXXXXXXX४५४८	९९३०४९.००	१९/०२/२०२६	११३.८००	११०.०००
शाखेचे नाव : धुळे (महाराष्ट्र)					
सुशिल सामदत्त किनगर	XXXXXXXXXXX२५२६	७३९०५४.००	०९/०२/२०२६	१२४.२००	१२०.१८०
सुशिल सामदत्त किनगर	XXXXXXXXXXX८८४७	६७२२९७.००	०९/०२/२०२६	११४.०५०	११९.०५०
शाखेचे नाव : किनवट सीभ९९७ (महाराष्ट्र)					
सौ. किरण प्रभु पैदोर	XXXXXXXXXXX५५५५	६६४९९१.००	२३/०१/२०२६	८४.९९०	८०.९९०
शाखेचे नाव : लातूर (महाराष्ट्र)					
महेश संभाजीराव कोकणे	XXXXXXXXXXX३७५०	१२०६७२६.०८	२३/०१/२०२६	११६.३००	१४८.६५०
नांचिकेत हिम्मत जळळी	XXXXXXXXXXX८६०२	२३०५६५.००	२७/०१/२०२६	११२.९००	१००.३००
सार्थक अहमदपाशा शेख	XXXXXXXXXXX१७८२	११७१७१.००	१६/०२/२०२६	१४.८००	१४.१००
शाखेचे नाव : मार्केट यार्ड (महाराष्ट्र)					
अमिन पंजा	XXXXXXXXXXX०८६९	११५४३४८.००	०९/०२/२०२६	१८६.५००	१७८.६००
शाखेचे नाव : परभणी (महाराष्ट्र)					
अजय बळासाहेब हुगुले	XXXXXXXXXXX२२८२	८०००८५.००	०९/०२/२०२६	१९५.५००	१०८.१७०
वैजनाथ नामदेवराव मुळे	XXXXXXXXXXX१७७२	२८९५३०.००	२७/१२/२०२५	४९.३००	४८.९००
वैजनाथ नामदेवराव मुळे	XXXXXXXXXXX१९६६	९८५८७३.००	२७/१०/२०२५	२९.३००	२८.७००
पूजा सुनिल लडेंगावकर	XXXXXXXXXXX४३३१	८२२४१.००	१६/०२/२०२६	१३.९१०	१३.१००
शाखेचे नाव : पाटण सीइ७०९९ (महाराष्ट्र)					
रामलाल दशरथ बडगुजर	XXXXXXXXXXX९०००	३४४१०१.९४	१६/०२/२०२६	४०.६००	३८.९००
विजय युवराज पाटील	XXXXXXXXXXX०२६७	१२७६५३.७७	१०/०१/२०२६	१७.१८०	१५.८९०
अक्षय सुदाम मोरे	XXXXXXXXXXX५५०३	६९३२४.००	१७/१०/२०२५	१२.७९०	११.४९०
रविंद्र रघुनाथ माळी	XXXXXXXXXXX४२७९	६५२६४.९३	१६/११/२०२५	११.१७०	१०.९००

निविदेच्या अटी आणि शर्ती

दागिन्यांची मूलतूत/राखीव किंमत लिलावाच्या दिवशी /तारखेला बोलीदारांना कळविण्यात येईल की, जेव्हा बोलीचा विचार करण्यात येईल. लिलावासाठी निविदा फॉर्मसोबत नमूद केल्याप्रमाणे लिलाव/बोलीची **रक्कम** विचारात घेतली जाईल. प्रस्तावाचे/निविदेचे अपॉइंट भरलेले फॉर्म ॲक्सेप्ट मानले जातील आणि ते नाकारण्यासाठी पात्र असतील.
निविदा कागदपत्रे त्या संदर्भातील अटी आणि शर्ती सारख्या वर नमूद केलेल्या बँकेच्या शाखेत उपलब्ध होतील. संपूर्ण माहिती असलेली निविदा कागदपत्रे बँकेच्या संबंधित शाखेत कार्यालयीन वेळेत दिनांक २७.०४.२०२६ रोजी जमा करावयाची आहेत. विहित तारखेच्या नंतर आलेल्या निविदा कागदपत्रांचा विचार करण्यात येणार नाही. सदरचे सोन्याचे दागिने हे **"जसे आहे, जेथे आहे", "जसे आहे,जे आहे", "तेथे जे आहे" आणि "आता फेरविचार नाही" वा तत्त्वावर** विक्रण्यात येतील. सदर सोन्याच्या दागिन्यांच्या संदर्भात म्हणजे सोन्याच्या दागिन्यांचा दर्जा, शुध्दता, आणि /किंवा अन्य कोणतीही येणे रक्कम, कर असल्यास, बँक कोणतीही जबाबदारी घेणार नाही. लिलावाच्या दिवशी, बँकेच्या शाखेत जे निविदादार वर नमूद केलेली तारीख आणि वेळेस उपस्थित राहतील, याशिवाय, त्यांच्या संबंधित बोलीत वाढ करतील/ सुधारणा करतील त्यांच्या उपस्थितीत निविदा उघडण्यात येतील.

वर नमूद केल्यानुसार शाखांची नावे. लिलावाची तारीख : २७.०४.२०२६ .

एकदा दाखल करण्यात आलेला प्रस्ताव/निविदा मागे घेता येणार नाही आणि, कोणताही प्रस्ताव/बोली ही एकाही वस्तू/दागिना यासाठी असेल तरीही बोलीदारास प्रस्तावाची रक्कम जमा करावी लागेल. जर एखादी वस्तू/दागिना यासाठी एखादेच अधिक बोलीदार असतील तर, सदर बोलीदारांच्या दरम्यान बोली लावण्यात येईल आणि सर्वाधिक बोली बोलणाऱ्या बोलीदारास यशस्वी बोलीदार घोषित करण्यात येईल. बोलीदाराने रर्व केवायसी कागदपत्रे म्हणजे, पॅन नंबर, पॅन कार्ड, आधार कार्ड आणि निवासी पत्त्याचा पुरावा आदी जमा करणे आवश्यक आहे. बोलीदाराने वैध ईमेल पत्ता आणि संपर्क क्रमांक दाखल करणे आवश्यक आहे. कोणताही प्रस्ताव स्वीकारणे किंवा नाकारणे हा अधिकार फक्त बँकेकडे असेल. सदर सोन्याचे दागिने / प्रस्ताव या संदर्भात म्हणजे सदर सोन्याच्या दागिन्यांच्या विक्रीच्या संदर्भात काही वाद /मतभेद हा विषय फक्त मुंबई येथील न्यायालय/ प्राधिकरण यांच्या कार्यकक्षेत राहील.

ठिकाण : महाराष्ट्र

अधिकृत अधिकारी
ॲक्सिस बँक लि.

MANAPPURAM FINANCE LTD.
CIN : L65910KL1992PLC006623
Registered Office: IV - 4 638A, Manappuram House, P.O. Valapad, Thrissur - 680 567, Kerala, India

लिलावाची नोटीस

विशेषकर गिरवीकर्तांसाठी आणि सामान्य रूप में जनता को एतद्द्वारा सूचित किया जाता है कि निम्नलिखित अकाउंट्स में रखे गए सोने के आभूषणों की सार्वजनिक नीलामी निम्नलिखित शाखाओं पर दिनांक 16.04.2026 को सुबह 10.00 बजे से किया जाएगा. हम ऐसे डिफॉल्टर ग्राहकों के सोने के आभूषणों की नीलामी करने जा रहे हैं जिन्होंने रजिस्टर्ड पत्र द्वारा सूचित किए जाने के बावजूद अपने लोन की रकम नहीं चुकाई है. जिन आवेदकों की नीलामी नहीं हो पाएगी, उनकी नीलामी किसी अन्य दिन बिना पुनः सूचना दिए की जाएगी. नीलामी के स्थान व तिथि (ऊपर कोई हो) में परिवर्तनों की कोई सूचना नीलामी केन्द्र या वेबसाइट पर लगाई जाएगी तथा इस बारे में कोई अन्य सूचना नहीं दी जाएगी.

गिरवियों की सूची :
हिंगोली हिंगोली 13831073000408 7,

ऊपर बताई गई नीलामी में हिस्सा लेने के इच्छुक व्यक्तियों को नीचे दी गई बातों का पालन करना होगा: इच्छुक बोली लगाने वालों को नीलामी के दिन ही एनईएफटी/आरटीजीएस के जरिए 10,000/- रुपये ईएमडी (जो बोली हारने वालों को वापस कर दिया जाएगा) जमा करना होगा। बोली लगाने वालों के पास वैध आईडी कार्ड/पैन कार्ड होना चाहिए। ज्यादा जानकारी के लिए कृपया 9072607147 पर संपर्क करें।

अधिकृत अधिकारी
मणप्पुरम फायनेंस लि. हेतु.

लोकसत्ता Classifieds
FROM ANYTHING TO EVERYTHING.

नावात बदल

I Am Changing My Name From SWARNA RAMGIRI To SWARNA SRINIVAS RAMGIRI For Passport Issuance. Devgiri Arcade, Omkareshwar Chow, Ulkanagari, Garkheda, Aurangabad-MH-431009
0071026317-1

I Am Changing My Name From ROHAN SHRINIVAS RAMGIRI To ROHAN SRINIVAS RAMGIRI For Passport Issuance. Devgiri Arcade, Omkareshwar Chowk, Ulkanagari, Garkheda, Aurangabad-MH-431009
0071026319-1

I Am Changing My Name From SHRINIVAS RAMGIRI To SRINIVAS NARAYAN RAMGIRI For Passport Issuance. Devgiri Arcade, Omkareshwar Chowk, Ulkanagari, Garkheda, Aurangabad-MH-431009
0071026316-1

महत्त्वपूर्ण निवेदन

सुरुवातीचे जाहिरात होण्याचा जाहिरातीचा मजकूर (अॅडव्हर्टाइज बोर्ड) स्वीकारण्याचाच काळजी घेतली जात असली तरी त्याच्या अशाप्रकारची (कन्टेन्ट) पडताळणी करणे शक्य होत नाही. तरी, आपल्या वृत्तपत्रांच्या अशा जाहिरातींच्या संदिग्ध होण्याच्या जाहिरातीतील जाहिरातदार वंचना, खोटेपणे संभव अथवा व्यक्तीकोणत्या व्यवहार केलेल्यापुढे कोणत्याही व्यवहाराचे नुकसान वा ह